## प्रेसनोट दिनांक ०८/०१०/२०१८

# कोकीन अंमली पदार्थ तस्करी करणारा परदेशी तरूण पोलीसांचे जाळयात

पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ पुणे शहर यांचेकडील प्राप्त माहितीप्रमाणे परिमंडळ १ यांचे पथक व खंडणी विरोधी पथक एकत्रितरित्या पेट्रोलिग फिरत असताना एन.आय.बी.एम रोडने कोंढवा भागात दोराबजी मॉल समोर आले असता तेथे एक नायजेरियन तरूण संशसितपणे फिरत असल्याचे दिसल्याने त्यास ताब्यात घेवून त्याची अंगझडीत घेतली असता त्याचेकडे ३५ ग्रॅम कोकीन हा अंमली पदार्थ ॲक्टीव्हा मोपेड मोटार सायकल व मोबाईल असा २७१५००/- रू किंमतीच्या मुद्देमालासह मिळून आला. त्यावेळी त्याने त्याचा नाव अहमद ऊर्फ जॉन ओलोरेडे वय- ४३ वर्ष रा. सध्या मुंबई सदरचा तरूण टोगो पश्चिम आफ्रिका देशाचा नागरीक आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त श्री.सुहास बावचे यांचे आदेशान्वये श्री रघुनाथ जाधव पोलीस निरीक्षक खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा,पुणे याचे दिमतीत पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ कार्यालयातील पोना. २४७१ जगदाळे, पोहवा. ५७४८ इनामदार, पोशि. ७३१३ साळुंके व खंडणी विरोधी पथकाचे पोहवा. ५४९९ मते, पोहवा.२९१८ गायकवाड, पोहवा. ५६७४ मगर, पोना. २२८७ बागवान, पोना. ६९४१ बोले याचेसह करून सदरचे इसमाविरूध्द पो ना ६२८ पालवे यांनी कोंढवा पोलीस ठाणेस फिर्याद देवून पुढील तपास कोंढवा पोलीस ठाणे हे करत आहेत.